# <u>वार्तापत्र</u>

पोलीस अधीक्षक कार्यालय,
गडचिरोली दि. २२/०२/२०१८

## पोलीस पाटील यांची माओवादयांकडून हत्या

उपविभाग एटापल्ली अंतर्गत येणाऱ्या मौजा लांजी येथे पोलीस पाटील कटिया पेका कुमोटी, वय- ५५ वर्ष याची आज माओवादयांनी पोलीस खबरी असल्याच्या संशयावरून हत्या केली.

काल रात्री कटिया कुमोटी हे रखवाली करीता त्यांची पत्नी, मुलगा आणि सून यांच्या सोबत शेतात रखवाली करीता गेले होते. काल रात्री १०.०० वा च्या सुमारास १० ते १५ सशस्त्र नक्षलवादी त्यांच्या शेतात येऊन सर्वांना बंदुकीचा धाक दाखवून दमदाटी व बळजबरीने पोेलीस पाटील कटिया कुमोटी यांना सोबत जंगलात घेवून गेलेे.

आज सकाळी लांजी गावाच्या बाहेर कुमोटी यंाचे प्रेत आढळून आले. त्यांचा डोक्यात दगड घालून निघृणपणे हत्या करण्यात आली. कुमोटी यांच्या खिश्यात माओवादयांनी ठेवलेली चिठ्ठी वरून पोलीस व माओवादी यांच्यात ताडपल्ली येथे झालेल्या फायरिंगची खबर दिल्याचा संशयावरून त्याची हत्या केल्याचे माओवादयांनी म्हटले आहे.